माहिती तंत्रज्ञान उद्योग घटकांना मुद्रांक शुल्क सूट मिळणेसाठी खाजगी माहिती तंत्रज्ञानाच्या पात्रतेचे निकष आणि अटी व शर्ती याबत —

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र.आयटीपी-२००५/प्र.क्र.३१२३/उद्योग-७.
मंत्रालय, मुंबई — ४०० ०३२.
दिनांक :- १० जून २००५.

वाचावे :-

(१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. मुद्रांक २०००/४२२१/सीआर-१०६४/म- १, दिनांक ५ मे २००१.

(2) उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्र.मातं/खाजगी/मातं-उद्यान/मुद्रांक शुल्क (१९)२००१/बी-२१७१५, दि.२१ जून २००१.

(3) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र. ITP-2003/CR 3311/Ind-7, दि. १२ जूलै, २००३.

(4) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र: मुद्रांक २००३/२०९३/प्रक्र ४६२/म-१, दिनांक २१.१२.२००३

प्रास्तावना :-

शासनाने सुरुवातीस जाहीर केलेल्या माहिती तंत्रज्ञान धोरणाअंतर्गत माहिती तंत्रज्ञान उद्योगांच्या विकासासाठी मनुष्यबळ विकास, उत्कृष्ट पायाभूत सुविधांची निर्मिती आणि आर्थिक व अनुषंगिक सुविधात्मक सवलती देण्याबाबत धोरणात्मक पुढाकार घेतला होता. माहिती तंत्रज्ञान उद्योग नागरीक्षेत्र प्रवण असल्यामुळे नागरी क्षेत्रात या उद्योगांचा पध्दतशीर व नियोजनबध्द विकास व्हावा यासाठी अशा घटकांना उत्कृष्ट पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिडको इ. उपक्रमांच्या माध्यमातून सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान उद्याने स्थापन केली आहेत. तथापि, खाजगी क्षेत्राच्या सहभागाने मोठ्या प्रमाणात दर्जेदार आणि किफायतशीर पायाभूत सुविधा राज्यात निर्माण व्हाव्यात यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे.

राज्यात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी खाजगी क्षेत्राच्या सहभागाने निर्माण करण्यात आलेल्या पायाभूत सुविधांचा विनियोग होऊन त्यास उत्तेजन मिळावे यासाठी सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत वर्गिकृत करण्यांत आलेल्या "अ" व "ब" क्षेत्रातील अशा खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानात प्रस्थापित होणाऱ्या माहिती तंत्रज्ञान घटकांना शासनाच्या महसूल व वन विभागाच्या आदेश क्र: मुद्रांक २००३/२०९३/प्रक्र ४६२/म-१, दिनांक २१.१२.२००३, अन्वये मुद्रांक शुल्कामध्ये ७५% सूट देण्यांत आली आहे. सदर सवलत अंमलात आणण्याकरिता खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांसाठी निकर्ष ठरवून त्यांच्या नोंदणीची कार्यप्रणाली उद्योग संचालनालयाने उपरोक्त संदर्भ क्र.३ येथील दि.२१ जून २००१ (वेळोवेळी सुधारित केलेल्या आदेशा) अन्वये निश्चित केली होती. ती कार्यपध्दती कायम करणे शासनाच्या विचाराधीन होते.

शासन निर्णय :

शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिडको, सॉफटवेअर टेक्नोलाजी पार्क ऑफ इंडिया, नवी मुंबई इ. संस्थासह विचार विनिमय करुन तसेच तामिळनाडू व अन्य काही राज्यांनी जाहीर केलेल्या योजनांचा अभ्यास करुन खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानासाठी विविध परिमाणाकरिता निकष आणि त्यांच्या नोंदणीची कार्यपध्दती उद्योग संचालनालयाने त्यांच्या दि. २१ जून २००१ अन्वये (वेळोवेळी सुधारित केल्यानुसार) खालीलप्रमाणे निश्चित केली आहे. त्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देत आहे.

१. निकष :

खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानासाठी विविध परिमाणांकरिता निकष आणि अटी व शर्ती निश्चित करण्यात आल्या असून सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये त्या दर्शविण्यात आल्या आहेत.

२. कार्यप्रणाली :

अ) प्रस्तावित माहिती तंत्रज्ञान उद्यानासाठी प्रवर्तकांना प्रथम इरादापत्र घ्यावे लागेल. सदर इरादापत्राची विधीग्राह्यता २ वर्षाची राहील. सदर कालावधीत माहिती तंत्रज्ञान उद्यानाची उभारणी न करता आल्यास अर्जदाराने सविस्तर समर्थनासह पुरेश्या दाखल कागदपत्रासह इरादापत्राची विधिग्राह्यता संपण्यापूर्वी किमान ३ महिने आधी मुदतवाढीसाठी अर्ज करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात गुणवत्तेच्या निकषांवर पुढील कालावधीसाठी मुदत वाढ देण्यात येईल. इरादापत्रातील परिमाणांप्रमाणे माहिती तंत्रज्ञान उद्यान प्रस्थापित केल्यानंतर प्रवर्तकांस सदर उद्यानासाठी नोंदणी घ्यावी लागेल. माहिती तंत्रज्ञान उद्यानातील बांधकाम क्षेत्राच्या विनियोजनाबाबत संनियंत्रण करण्यासाठी नोंदणी पत्राची विधीग्राह्यता ३ वर्षासाठी राहील. त्यानंतर नोंदणीचे वेळोवेळी नुतनीकरण न केल्यास नोंदणी रद्द करण्यात येईल.

ब) प्रवर्तकांना इरादापत्र प्राप्त करण्यासाठी करावयाच्या विहित अर्जामध्ये विविध परिमाणांसाठी विहित केलेल्या निकषांची पूर्तता करण्यासाठी केलेल्या प्रस्तावित व्यवस्थेची सविस्तर माहिती देवून पूर्ततेची हमी देणे आवश्यक आहे. तसेच अर्जा सोबत संबंधित सेवा पुरविणाऱ्या संस्थांचे आधारभूत (supporting) पत्रव्यवहार प्रवर्तकांनी सादर करावयाचा आहे.

क) इरादापत्र आणि नोंदणी साठी विहित अर्जाचे नमूने व त्यासोबत सादर करावयाच्या कागदपत्राची सूची अनुक्रमे परिशिष्ट – २ व ३ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

ड) प्रवर्तकांनी माहिती तंत्रज्ञान उद्यानाकरिता इरादापत्र आणि नोंदणी प्रमाणपत्र मिळण्याकरिता मुंबई महानगरासाठी विकास आयुक्त (उद्योग) आणि राज्यातील उर्वरित जिल्ह्यासाठी संबंधित महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांचेकडे अर्ज सादर करावयाचे असून विहित सहपत्रांसह परीपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर या सक्षम अधिकाऱ्यांनी १५ दिवसांत इरादापत्र / नोंदणी प्रमाणपत्र अदा करावयाचे आहे. महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांना प्रदान करण्यात आलेले अधिकार समवर्ती राहतील.

इ) इरादापत्र किंवा नोंदणी प्रमाणपत्रातील कोणत्याही बाबीमध्ये बदल करावयाचा झाल्यास अर्जदारांस इरादापत्रात प्रवर्तकांस स्वतंत्र अर्ज करुन सक्षम अधिकाऱ्याची मंजूरी घेणे आवश्यक आहे. ... नमूद करलेल्या निकष आणि अटी व शर्तीची पूर्तता केल्या नंतरच आणि तसा अर्ज केल्यास माहिती

तंत्रज्ञान उद्यानासाठी नोंदणी प्रमाणपत्र देण्यात येईल. विहित निकष आणि अटी व शर्तीच्या अधीन राहून गुणवत्तेच्या निकषांवर अर्जदारांची विनंती सक्षम अधिका-यांनी मान्य करण्यास हरकत नाही.

प) शुल्क : माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या इरादापत्रासाठी तसेच नोंदणीसाठी अर्जासोबत रु.१०००/- एवढे शुल्क पुढील लेखाशिर्षाखाली प्रवर्तकांनी भरणा केल्याचे रिझर्व्ह बँकेच्या चलनाची प्रत जोडण्यात यावी.

"0851 Village & Small Industries
102, Small Scale Industries
Cottage & Small Industries
0851-002-6"

इरादापत्र आणि नोंदणी प्रमाणपत्राच्या नुतनीकरणासाठी तसेच त्यामध्ये कोणताही बदल करण्यासाठी केलेल्या अर्जासाठी देखील सदर शुल्क लागू राहील.

फ) संनियंत्रण : माहिती तंत्रज्ञान उद्यानांसाठी विहित केलेल्या निकष आणि अटी व शर्तींचे पालन होत असल्याबाबत संनियंत्रण करण्याची जबाबदारी संबंधित सक्षम अधिका-याची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रितम आठवले)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,

१. प्रधान सचिव, महसूल पुर्नवसन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
२. सचिव, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
३. सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई ३२.
४. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मंत्रालयासमोर, मुंबई ३२.
५. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव.
६. मा. राज्यमंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव,
७. आयुक्त, महानगर पालिका (सर्व)
८. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, मुंबई ५१.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पूर्व), मुंबई.
१०. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
११. विभागीय आयुक्त, पुणे / नाशिक / नागपूर / औरंगाबाद / अमरावती / मुंबई.
१२. महानिरिक्षक, नोंदणी व नियंत्रक, मुद्रांक शुल्क, पुणे.
१३. नियंत्रक, उद्योग मित्र, मुंबई.
१४. अधिक्षकीय उद्योग अधिकारी (माहिती तंत्रज्ञान), उद्योग संचालनालय, मुंबई ३२.
१५. संचालक, सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क्स ऑफ इंडिया, पुणे.
१६. उप महानिरिक्षक, मुद्रांक शुल्क, मुंबई
१७. उद्योग विभागातील सव सहसचिव/उपसचिव/कक्ष अधिकारी.
१८. कक्ष अधिकारी (म-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. निवड नस्ती (उद्योग-७)

परीशिष्ट - १

## खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानासाठी विविध परिमाणांकरिता निकष आणि अटी व शर्ती

१ अर्जदाराची अर्हता :

१.१ खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान स्थापन करणा-या संस्थाची घटना नोंदणकृत मालकी / भागीदारी संस्था / खाजगी मर्यादित कंपनी / सार्वजनिक मर्यादित कंपनी / सहकारी संस्था अथवा ट्रस्ट यापैकी असावी.

१.२ माहती तंत्रज्ञान उद्यानाकरीता विहित केलेल्या निकष आणि अटी व शर्तीची पूर्तता करण्यासाठी उद्यानाच्या व्यवस्थापनाबाबत कायदेशीर जबाबदार संस्था, उद्यानाचे प्रवर्तक किंवा विकासक अर्ज करण्यास पात्र आहेत.

२ खाजगी क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान उद्यानांच्या विविध परिमाणांचे निकष

| अ.क्र. | पायाभूत सोयी सुविधांचे परीमाण | निकष |
|---|---|---|
| १. | जमीन/ बांधकाम क्षेत्रफळ | माहिती तंत्रज्ञान उद्यानासाठी किमान २ एकर जमीन किंवा किमान २०,००० चौ. फूट एवढे बांधकाम क्षेत्रफळ माहिती तंत्रज्ञान उद्योगांसाठी आणि त्यांना पुरवावयाच्या पूरक सेवांसाठी आवश्यक आहे. |
| २. | बांधकाम क्षेत्राचे विनियोजन / वापर | एकूण बांधकाम क्षेत्रफळाच्या किमान ६० टक्के बांधकाम क्षेत्रफळ माहिती तंत्रज्ञान उद्योग / सहाय्यभूत सेवा उद्योग आणि उर्वरित बांधकाम क्षेत्रफळ (वाहनतळाची जागा वगळून) अनुषंगिक / पूरक सेवा सुविधांसाठी वापरणे बंधनकारक आहे. |
| ३. | विद्युत पुरवठा व्यवस्था व क्षमता | माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या एकूण बांधकाम क्षेत्राच्या अनुषंगाने २० वॅट प्रती चौ. फूट या दराने निश्चित करण्यात आलेल्या वीज पुरवठा क्षमतेचे स्वतंत्र सब स्टेशन उद्यानाच्या आवारात ऊभारुन सदर सब स्टेशनास वीज पुरवठा करणा-या कंपनीच्या नजिकच्या स्त्रोतातून समर्पित विद्युत पुरवठा वाहिनीच्या माध्यमातून उद्यानाच्या प्रवर्तकास वीज पुरवठा प्राप्त करणे आवश्यक आहे. |
| ४. | राखीव विद्युत पुरवठा व्यवस्था | वरील मुद्दा क्र. ३ प्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या एकूण विद्युत पुरवठा क्षमतेच्या किमान ३० टक्के एवढी राखीव विद्युत निर्मितीची व्यवस्था प्रवर्तकास करणे बंधनकारक आहे. |
| ५. | जोडणी क्षमता (Connectivity) | (१) माहिती तंत्रज्ञान उद्यानात सॅटलाईट अर्थ स्टेशन उपलब्ध असल्यास जोडणीच्या क्षमतेची मर्यादा लागू राहणार नाही. अन्यथा किमान २ एमबीपीएस क्षमतेची ओएफसी जोडणी पुरविणे आवश्यक आहे. |



शा.मु./एच-540(200-6-2005)-3

| अ.क्र. | पायाभूत सोयी सुविधांचे परीमाण | निकष |
| --- | --- | --- |
| | | (२) उद्यानाच्या आवारात दोन जोडणी सेवा पुरविणाऱ्या कंपनीची एक्सचेंजची आवश्यकता नाही. तथापि, उद्यानांमध्ये लास्ट माइल कनेक्टीव्हीटी (Last mile connectivity) उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच इंटरनॅशनल कनेक्टीव्हीटी करीता गेटवे (Gateway for International connectivity) उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था असावी. |
| ६. | वाहनतळ क्षमता (पार्किंगसाठी) | माहिती तंत्रज्ञान उद्यानाच्या एकूण बांधकाम क्षेत्राच्या अनुषंगाने प्रति १०० चौ. मीटर बांधकाम क्षेत्रापोटी एक वाहनासाठी पार्किंग या दराने वाहनतळ क्षमता उद्यानात उपलब्ध असणे आवश्यक आहे. |